आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१६ जून २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेची आणि पहिल्यांदाच होणाऱ्या जातनिहाय जनगणनेची अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध

- कार्यक्षमता, वेग आणि अचूकता यांच्या बळावर भारत आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी बजावत असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यात नव्या शैक्षणिक वर्षाला प्रारंभ, शाळाशाळांमधे मान्यवरांनी केलं विद्यार्थ्यांचं स्वागत

- राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा जोर

**आणि**

- गेल्या २४ तासात विविध दुर्घटनांमधे १८ जणांचा मृत्यू

**<><><><>**

२०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेची आणि पहिल्यांदाच होणाऱ्या जातनिहाय जनगणनेची अधिसूचना आज राजपत्रात प्रसिद्ध झाली. ही १६वी राष्ट्रीय जनगणना असून भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची आठवी जनगणना आहे. देशभरात ३४ लाख प्रगणक आणि निरीक्षक, एक लाख तीन हजारांहून जास्त अधिकारी आधुनिक मोबाईल डिजिटल प्रणालीद्वारे या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची यादी, मालमत्ता आणि सुविधा या माहितीचं संकलन, दुसऱ्या टप्प्यात सामाजिक-आर्थिक आणि जात विषयक माहिती संकलन करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत डिजिटल ॲप आणि स्व-गणनेची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

देशातल्या बर्फाळ प्रदेशात जनगणनेसाठी एक ऑक्टोबर २०२६ हा संदर्भ दिनांक निश्चित करण्यात आला आहे. तर उर्वरित देशात एक मार्च २०२७ हा संदर्भ दिनांक असेल.

**<><><><>**

गेल्या दहा वर्षात भारताने आपली कार्यक्षमता, वेग आणि अचूक व्यवस्थापन यांच्या बळावर आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री

अमित शहा यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथे राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मदतकार्य आयुक्त आणि आपत्ती प्रतिसाद दलांच्या परिषदेला संबोधित करत होते.

विविध प्रकारच्या संकटांमध्ये बचावकार्य करण्यासाठी जिल्हा पातळीवर आपत्ती व्यवस्थापन योजना असणं महत्त्वाचं आहे, असं सांगताना विविध राज्यांच्या मदतकार्य आयुक्तांना पुढच्या ९० दिवसात प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्याच्या सूचनाही शहा यांनी दिल्या. हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीमुळे आज संपूर्ण जगाला संकटं भेडसावत आहेत. गेल्या दहा वर्षांत मात्र, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण NDMA, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल NDRF आणि आपत्ती प्रतिरोधक कोअलिशन CDRI यांच्या बळावर भारत आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात जगाचं नेतृत्व करत आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

अहमदाबाद विमान अपघाताच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीची पहिली बैठक आज नवी दिल्लीत होत आहे. केंद्रीय गृह सचिव बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील.

दरम्यान, अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी यांचे डीएनए नमुने जुळले असून त्यांच्या पार्थिवावर आज राजकोटमधे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासह अनेक मान्यवरांनी आज रुपाणी यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेऊन आदरांजली वाहिली.

**<><><><>**

पुणे जिल्ह्यात इंद्रायणी नदीवरचा पूल कोसळल्याप्रकरणी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आज उच्चस्तरीय बैठक झाली. सार्वजनिक बांधकाम, ग्राम विकास विभागाचे सचिव, पुण्याचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

या दुर्घटनेत आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाला, तर ५१ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. त्यापैकी ८ जणांची प्रकृती गंभीर आहे. दोन ते तीन जण अद्यापही बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे.

**<><><><>**

कुंडमळा इथं इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या दुर्घटने प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. कुंडमळा इथं पावसाळ्यात पर्यटक मोठ्या संख्येनं येतात हे माहीत असतानाही हा धोकादायक पूल खुला का ठेवला असा प्रश्न सपकाळ यांनी उपस्थित केला.

सिंधुदुर्ग जिल्हयात राजकोट इथल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याला भगदाड पडल्यावरून सपकाळ यांनी सरकारवर टीका केली. महायुती सरकारने महापुरुषांच्या पुतळ्यालाही भ्रष्टाचाराची कीड लावली, असा आरोप सपकाळ यांनी केला.

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सायप्रसचा ‘ग्रँड कोलार ऑफ दी ऑर्डर ऑफ दी मकारिओस थर्ड’ हा सर्वोच्च नागरी सन्मान आज सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस क्रिस्तोदौलिदेस यांनी प्रदान केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कालपासून पाच दिवसांच्या सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर आहेत.

<><><>

राज्यात आजपासून नवीन शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीनं अनेक शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळांमधे विद्यार्थ्यांचं स्वागत केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून, दुर्वेस इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत शाळा प्रवेशोत्सव सोहळ्यात ते सहभागी झाले होते. सातारा जिल्ह्यात कोडोली इथं जिल्हा परिषदेच्या शाळेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्ह्यात दौंड इथं जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. सांगली जिल्ह्यात राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या शाळेत जाऊन शाळेच्या पहिल्या दिवसानिमित्त विद्यार्थ्यांचं स्वागत केलं, आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी तर नवी मुंबईत आयुक्त कैलास शिंदे यांनी महानगरपालिकेच्या शाळेत विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. रत्नागिरी जिल्ह्यात विविध शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा करून विद्यार्थ्यांचं शाळेत स्वागत करण्यात आलं. जिल्ह्यात १० हजार १२१ विद्यार्थ्यांनी पहिलीला प्रवेश घेतला आहे.

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर नगरपरिषद प्राथमिक शाळेत नवीन विद्यार्थ्यांचं फेटे बांधून, फुलं आणि पेढे देऊन तसंच पावलांचे ठसे घेऊन स्वागत करण्यात आलं.

सोलापूर जिल्ह्यातल्या इंगळगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीतल्या विद्यार्थ्यांचं आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते स्वागत करण्यात आलं. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचं वितरण तसंच शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आलं.

लातूर जिल्ह्यात शाळेच्या पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांचं उत्साहात स्वागत करताना पहिलीतल्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकं, गणवेश, बूट आणि मोजे वितरित करण्यात आले. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेण्याचा विशेष उपक्रमही राबवला जात आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं पहिल्यांदा शाळेत येणाऱ्या चिमुकल्यांचं औक्षण करून तसंच फुलांची उधळण करून स्वागत केलं.

**<><><><>**

भारताचा घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित वार्षिक महागाई दर मे महिन्यात ३९ शतांश टक्क्यापर्यंत घसरला असल्याची माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्रालायने जाहीर केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे. यात १ पूर्णांक ७२ शतांश टक्क्याची घट झाली आहे. वीज आणि इंधनाच्या किमतीही २ पूर्णांक २७ शतांश टक्क्यानी कमी झाल्या आहेत. उत्पादन क्षेत्रातल्या महागाई दरात दोन टक्क्याहून अधिक वाढ झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या आकडेवारीत म्हटलं आहे.

**<><><><>**

राज्यातल्या अनेक भागात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झालं आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल्या अनेक नद्यांना पूर आला असून, तीन नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. मुसळधार पावसामुळे दापोलीतून दाभोळला जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर झाड कोसळल्यामुळे वाहतूक काही काळ बंद झाली होती. संगमेश्वर तालुक्यात धामणी-

गोळवलीतल्या आमकरवाडीत काल रात्री पडलेल्या अतिपावसामुळे भूस्खलन होऊन डोंगराचा काही भाग खाली आला. चार-पाच फूट उंचीची पोफळीची ७० रोपं मातीखाली गाडली गेली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. राजापूरमध्ये अर्जुना-कोदवली नद्यांना पूर आल्यानं शहरातल्या जवाहर चौकापर्यंत पाणी आलं आहे. मुंबई-गोवा महामार्गावर लांजा तालुक्यातल्या वाकेड घाटामध्ये काल मध्यरात्री दरड कोसळली. त्यामुळे एका बाजूनं रस्ता बंद झाल्यानं वाहतुकीवर परिणाम झाला होता; मात्र दरड हटवण्याचं काम सकाळी हाती घेण्यात आलं. खेड तालुक्यात कशेडी घाटातही काल संध्याकाळी दरड कोसळली होती. गुहागर तालुक्यात, तसंच रत्नागिरी तालुक्यातही काही ठिकाणी रस्त्यावर दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत.

पालघर जिल्ह्यातही आज सकाळपासून जोरदार पाऊस सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

पुणे जिल्ह्यात मुळशी परिसरात रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे स्मशानभूमी पाण्याखाली गेली आहे. पिरंगुट इथल्या पुणे-कोलाड महामार्गावरील तात्पुरता बांधलेला भराव वाहून गेला असून, नवीन पुलाच्या कठड्यांपर्यंत पाणी आलं आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात जोरदार पावसामुळे अनेक बंधारे पाण्याखाली गेले. राजाराम आणि शिंगणापूर बंधारे जलमय झाले असून, पंचगंगा नदीची पाणीपातळी १४ फूटांवर पोहोचली आहे.

**<><><><>**

राज्यभरात काल विविध दुर्घटनांमध्ये तब्बल १८ जणांचा मृत्यू झाला आणि ६५ जण जखमी झाले. पुण्यात नदीवरचा लोखंडी पूल पडल्यानं चौघांचा, तर अहिल्यानगरमध्ये रस्ते अपघातात तिघांचा मृत्यू झाला. वीज पडून जळगावात तिघांचा मृत्यू झाला आणि एक जण जखमी झाला. रायगडमध्ये तिघांचा, बुलढाण्यात दोघांचा आणि अहिल्यानगरमध्ये एकाचा बुडून मृत्यू झाला. जळगावमध्ये भिंत पडून आणि ठाण्यात दरीत पडून एक जण मृत्यूमुखी पडला.

**//<><><><>//**